## // प्रेस नोट // दिनांक ०१/०९/२०१८

**लोकसेवक नंदकिशोर पापालाल मोदी, वय ५७ वर्षे, धंदा नौकरी मुख्याद्यापक,वैद्यानाथ विद्यालय (मा.) परळी वैजिनाथ,वर्ग-२ यांना १,५०,०००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

---

दि.२८/०८/२०१८ रोजी तक्रारदार यांनी अेसीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार हे वैद्यनाथ विद्यालय (मा.) परळी वैजिनाथ कनिष्ठ लिपीक पदावर नेमणुकीस आहेत. सन २०१२ मध्ये संस्थेने ४ शिक्षक व १ लिपीक यांची नेमणुक नियमबाहय असल्याचे कारणाने त्यांना सेवेतून कार्यमुक्त केले होते. मुख्याद्यापक श्री.मोदी यांनी तक्रारदार यांना बोलावून सांगीतले की,सेवा समाप्त कर्मचाऱ्यापैकी २ कर्मचाऱ्यांनी, शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचेकडे तक्रार केली असून सदर चौकशी शिक्षणाधिकारी (मा.) बीड यांचेकडे चालु आहे. सदर चौकशीमध्ये मुख्याद्यापक मोदी यांनी लिपीक या पदाचे संबंधाने तक्रारदार याची बाजू मांडण्यासाठी २,००,०००/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. तक्रारदार यांनी २,००,०००/-पैसे दिले नाही तर त्यांची सेवा समाप्त करुन तक्रारदार ऐवजी रोहीत काळे याला सेवेत परत रुजु करण्यात येईल असे सांगून २,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी करित आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ३१/०८/२०१८ रोजी परळी येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत खात्री केली असता मुख्याद्यापक मोदी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी २,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन १,५०,०००/-रु. लाच रक्कम आज व उर्वरीत ५०,०००/- रुपये एक महिन्याचे आत स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक ०१.०९.२०१८ रोजी लोकसेवक मोदी यांचे विरुध्द पेठ गल्ली,देशमुख पार,परळी येथील त्यांचे राहते घराचे परिसरात लाचेचा सापळा आयोजित केला असता लोकसेवक मोदी यांना तक्रारदार यांचेकडून १,५०,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले असून लोकसेविक नंदकिशोर पापालाल मोदी,वय ५५ वर्षे,धंदा नौकरी मुख्याद्यापक,वैद्यानाथ विद्यालय (मा.)परळी वैजिनाथ, वर्ग-२ यांचे विरुध्द पोस्टे परळी शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. गुन्हयाची तपास पोनि श्री. गजानन वाघ हे करित आहेत.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी साहेब,पोलीस अधीक्षक,मा.श्री.एस.आर.जिरगे साहेब,अपर पोलीस अधीक्षक, अेसीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, पोनि गजानन वाघ पोशि/कल्याण राठोड,मनोज गदळे,सखाराम घोलप,भरत गारदे,पोह/अशोक ठोकळ, दादासाहेब केदार, पोना/विकास मुंडे, अमोल बागलाने यांनी केली आहे.

याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२४४२/२२२६४९ |
| मेल आयडी | :- | dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- | www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

01/09

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.
करिता.

पोलीस उप-अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र